# आधुनिक केसरी

शनिवार, ०३ डिसेंबर २०२२

⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१११

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●SATURDAY 03 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-111 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-8 ●PRICE-5


## गाडी देतेय जाहिरातीपेक्षा कमी मायलेज

### ग्राहकाची थेट कोर्टात धाव; कंपनीला ३ लाख १० हजारांचा दंड

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : अनेक कंपन्यांकडून ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी कार - बाईक किती मायलेज देते, याचा आकडा जाहिरातीत दिला जातो. कंपनीच्या शोरूममध्ये किंवा सेल्समनकडून मायलेजची आकडेवारी ग्राहकांना ठळकपणे सांगितली जाते. बऱ्याचदा ही आकडेवारी आणि प्रत्यक्षात मिळणारा मायलेज या गोष्टी जुळत नाहीत. पण आता असे करणे कंपन्यांसाठी त्रासदायक ठरू शकते. कारण अशाच एका प्रकरणात केरळमधील ग्राहक न्यायालयाने संबंधित कंपनीलाच ३ लाख १० हजारांचा दंड केला आहे. 'लाईव्ह लॉ'ने या बाबतचे वृत्त दिले आहे.**



२०१४ साली तक्रारदार सौदामिनी पी. पी. यांनी फोर्ड क्लासिक डिझेल कार विकत घेतली. या कारसाठी त्यांनी ८ लाख ९४ हजार ८७६ इतकी रक्कम कंपनीला दिली. सौदामिनी कार घेण्यासाठी थ्रिसूरमधील शोरूममध्ये गेल्या असता त्यांना कारसंदर्भात माहिती देणारे पत्रक देण्यात आले. या पत्रकामध्ये इतर माहितीसह कारच्या मायलेजबाबतही उल्लेख करण्यात आला होत. यानुसार, ही कार ३२ किलोमीट प्रतिलिटर इतके मायलेज देते, असा दावा करण्यात आला होता. प्रत्यक्षात मात्र, कार कमी मायलेज देत असल्याचं सौदामिनी यांच्या लक्षात आलं. सौदामिनी यांनी थ्रिसूरच्या कैराली फोर्ड प्रायव्हेट लिमिटेड या शोरूममध्ये दाद मागितली, मात्र, त्यांचा भ्रमनिरास झाला. अखेर त्यांनी २०१५मध्ये ग्राहक कोर्टाचे दरवाजे ठोठावले. कंपनीने आपली फसवणूक केल्याची तक्रार त्यांनी याचिकेत केली होती. यासंदर्भात सविस्तर सुनावणी झाल्यानंतर कोर्टाने त्यांच्या बाजूने निकाल दिला. यासाठी न्यायालयाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांच्या नेतृत्वाखालील कमिटीकडून मायलेजची तपासणी करून घेतली. यावेळी कार १९.६ किलोमीटर प्रतिलिटर इतकाच मायलेज देत असल्याचे स्पष्ट झाले. ३ लाख १० हजार रुपयांची भरपाई त्यांना देण्याचे निर्देश न्यायालयाने यावेळी दिले. दरम्यान, माहितीपत्रिकेमध्ये नमूद करण्यात आलेला मायलेज हा तटस्थ कंपनीकडून तापसल्यानंतरच देण्यात आला होता, असा युक्तीवाद फोर्ड कंपनीकडून करण्यात आला. मात्र, न्यायालयाने तो युक्तीवाद फेटाळून लावला. फोर्ड कंपनी आणि संबंधित शोरूमला दंड ठोठावताना न्यायालयाने मायलेजच्या दाव्याबाबत सविस्तर टिप्पणी केली. प्रत्येक ग्राहक वेगवेगळ्या कंपन्यांच्या माहितीपत्रिकेमध्ये दिलेली माहिती पडताळून त्यांची तुलना करत असतो. या माहितीचा त्याच्या कार निवडीबाबतच्या निर्णय प्रक्रियेवर परिणाम होत असतो. कंपनीच्या माहितीपत्रिकेत एकदा एखादी माहिती समाविष्ट केली, की त्यानंतर उत्पादक कंपनी तटस्थ कंपनीकडून तपासणी करण्यात आल्याचे कारण देऊन हात झटकू शकत नाही, अशा शब्दांत न्यायालयाने फोर्ड कंपनीला सुनावले. न्यायालयाने कंपनीला ठोठावलेल्या दंडाच्या रकमेमध्ये तीन प्रकारच्या दंडाचा समावेश आहे. यामध्ये ग्राहक महिलेला झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई म्हणून १.५० लाख रुपये, ग्राहक महिलेला झालेल्या मानसिक त्रासाची नुकसान भरपाई म्हणून १.५० लाख रुपये आणि न्यायालयीन प्रक्रियेसाठी झालेला खर्च म्हणून ९ टक्के व्याजाच्या रकमेसह १० हजार रुपये असा एकूण ३ लाख १० हजार रुपये दंड न्यायालयाने ठोठावला.

## महत्वाची बातमी

### इस्त्रो हेरगिरी ; आरोपींचा अटकपूर्व जामीन रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे माजी शास्त्रज्ञ एस. नंबी नारायणन यांना विनाकारण गुंतवलेल्या इस्त्रो हेरगिरी प्रकरणातील पाच आरोपींचा अटकपूर्व जामीन सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला आहे. यात केरळच्या माजी पोलीस महासंचालकांचाही समावेश आहे. उच्च न्यायालयाने पाचही आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. त्याविरोधात सीबीआयकडून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती एमआर शाह आणि न्यायमूर्ती सीटी रविकुमार यांच्या खंडपीठासमोर २८ नोव्हेंबर सुनावणी झाली होती. आज यासंदर्भातील निर्णय न्यायालयाने जाहीर केला. तसेच हे प्रकरण पुन्हा केरळ उच्च न्यायालयाकडे पाठवत यावर चार आठवड्यात निर्णय घेण्याचे निर्देश दिले. जोपर्यंत केरळ उच्च न्यायालयाचा निर्णय येत नाही, तोपर्यंत आरोपीला अटक करू नये, असेही स्पष्ट करण्यात आले. काही दिवसांपूर्वीच केरळ उच्च न्यायालयाने गुजरातचे माजी पोलीस महासंचालक आरबी श्रीकुमार, केरळचे माजी पोलीस महासंचालक सीबी मॅथ्यूज, अन्य दोन पोलीस अधिकारी एस विजयन आणि थंपी एस दुर्गा दत्त तसेच निवृत्त अधिकारी पीएस जयप्रकाश यांना इस्त्रो हेरगिरी प्रकरणी अटकपूर्व जामीन मंजूर केला होता.

## भविष्याची पेरणी



*वाटेवर काटे वेचताना असे गुलाब यावे हाती। ही वाटचाल आश्वासक, पेरणी भविष्यासाठी।।*

भारत जोडो यात्रेत मध्यप्रदेशातील उज्जैन येथे अभिनेत्री स्वरा भास्कर सहभागी झाली. यावेळी तिने राहुल गांधी यांना गुलाबाची फुले भेट दिली.

## महाराष्ट्राच्या मंत्र्यांनो बेळगावला येऊ नका

### कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**रामदुर्ग :** कर्नाटक सीमालगत असणाऱ्या सांगलीच्या जत तालुक्यातील गावातील समस्यांवरुन गावकरी आक्रमक झाले आहेत. गावकऱ्यांनी कर्नाटकमध्ये जाण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनीही महाराष्ट्राला डिवचण्याचा प्रयत्न केला होता. हे प्रकरण ताजे असतानाच आता आणखी एकदा कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी वादग्रस्त वक्तव्य केलेय. महाराष्ट्रातील मंत्र्यांनी बेळगावला भेट देऊ नये, असा इशाराच कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्माई यांनी आज दिला. यावरुन पुन्हा एकदा महाराष्ट्र आणि कर्नाटक असा सीमावाद उफळला आहे. सध्या कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्यात असलेली परिस्थिती पाहाता महाराष्ट्राच्या मंत्र्यांनी सध्या बेळगावला भेट देऊ नये, असा इशारा कर्नाटकच्या मुख्य सचिवांनी महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांना पाठवला आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्माई यांनी रामदुर्ग तालुक्यातील सालहळी गावात पत्रकारांशी बोलताना याबाबतची माहिती दिली.

**संजय राऊत काय म्हणाले? :** कर्नाटकच्या सचिवांनी आपल्या मुख्यमंत्री यांना पत्र पाठवले आहे. एका राज्यातील नेत्यांना दुसऱ्या राज्यातील नेते अडवतात, असे या देशात पहिल्यांदाच घडत आहे. कर्नाटकशी आमचे घरगुती भांडण नाही. महाराष्ट्रात येण्यासाठी अनेक लोक आंदोलन करत आहेत. बाळासाहेब ठाकरेंना याच कारणासाठी तुरुंगवास झाला. हे क्रांतिकातक सरकार आल्यापासून शेपूट घालण्याची क्रांती केली. कर्नाटकने महाराष्ट्र सरकारला कानफटात मारली, सरकार षंढासारखे बघत बसले. महाराष्ट्र पाणी दाखवणारे राज्य होते, आज मात्र ते आपल्याला पाणी दाखवत आहेत, असे राऊत म्हणाले.


## मुंबईतील सेस इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

### देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नांना यश, राष्ट्रपतींकडून विधेयकाला मंजुरी




आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम सुधारणा विधेयकाला देशाच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिली असून, त्यामुळे मुंबई शहरातील धोकादायक व रखडलेल्या सेस (उपकर) इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा होणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांना यामुळे यश आले असून, त्यांनी राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे आभार मानले आहेत. आता या नव्या कायद्यानुसार विविध कारणांमुळे अपूर्ण राहिलेले - रखडलेले सेस (उपकर) इमारती प्रकल्प म्हाडामार्फत ताब्यात घेऊन त्याचा पुनर्विकास करणे यामुळे शक्य होणार आहे. सध्यस्थित मुंबई शहरातील सुमारे 56 हून अधिक सेस (उपकर) इमारतींचे पुनर्विकास रखडले होते वा अपूर्ण होते. त्यामुळे, थेट म्हाडाला अशा इमारतींचा ताबा घेऊन पुनर्विकास करता येणार आहे. तसेच मुंबई महापालिकेने एखादी सेस (उपकर) इमारत धोकादायक जाहीर केल्यास सर्वप्रथम इमारत पुनर्विकासाची संधी इमारत मालकाला देण्यात येईल. त्याने 6 महिन्याच्या आत पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर न केल्यास दुसरी संधी भाडेकरूंना देण्यात येईल. त्यांनी देखील 6 महिन्याच्या आत पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर न केल्यास हे दोन्ही प्रयत्न फसल्यानंतर विहित कालावधीत पुनर्विकास न केल्यास त्या इमारती ताब्यात घेऊन म्हाडाला पुनर्विकास करता येईल. संबधित इमारतींचा मालकाला किंवा भूस्वामीला रेडिरेकनरच्या दराने 25 टक्के अथवा विक्री घटकाच्या बांधिव क्षेत्रफळाच्या 15 टक्के यापैकी जे अधिक असेल अशा दराने नुकसानभरपाई प्रदान करण्याची यात तरतूद आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे सेस (उपकर) इमारतींचा रखडलेला पुनर्विकास आता मार्गी लागणार आहे. 28 जुलै 2022 रोजी राज्य सरकारने सर्व कागदपत्रे, अशा प्रलंबित पुनर्विकास योजनांची सर्व छायाचित्र, न्यायालयात प्रलंबित खटले अशी संपूर्ण माहिती केंद्रीय गृहमंत्रालयाला सादर केली होती. त्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सातत्याने केंद्रीय गृह मंत्रालयाकडे आग्रह धरला होता. आता या विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली असल्याने मुंबईतील सेस इमारतींच्या पुनर्विकासाला चालना मिळणार आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# धन्यवाद हो धन्यवाद

आधुनिक केसरी

मग तो स्वतःच सांगू लागला. साहेब इथल्या लोकांना माझी किंमत नाही. माझ्याकडे ते एक रिक्षावाला म्हणून पाहतात. रिक्षावाल्याला कोण किंमत देणार ? पण माझा एक मुलगा पुण्यात डॉक्टर आहे आणि दुसरा मुलगा इंजिनिअर आहे. मी त्यांना म्हटले की खूपच छान. हीच तुमची खरी कमाई आहे. आणि रिक्षावाला म्हणून तुम्ही स्वतःला कमी समजू नका. माझ्या रिक्षेत बसणारा प्रत्येक प्रवासी हा परमेश्वराचे रूप आहे. मी त्याला त्याच्या इच्छित स्थळी घेऊन जातो आहे. परमेश्वराची सेवा माझ्या हातून घडते आहे ही भावना मनात ठेवा. कोणतेही काम हलके नाही. माझे बोलणे ऐकून तो खूप समाधानी झाला. तो म्हणाला ' तुम्ही माझ्या कामाला एकदम उच्च दर्जावर नेऊन ठेवलेत. आता माझे काम मी आणखी आनंदाने मन लावून करीन. त्या रिक्षावाल्याने आपले नाव कदम असे सांगितले आणि ' साहेब, जेव्हा तुम्ही पुन्हा याल, तेव्हा जरूर मला कळवा. मी तुम्हाला घ्यायला येईन ' असे म्हणून



माझा निरोप घेतला.
तुम्ही म्हणाल हे सगळं ठीक आहे हो पण कृतज्ञता व्यक्त करायलाच हवी का ? त्यामुळे असं काय होणार आहे की मी ती गोष्ट आवर्जून करावी ? त्यासाठीच तर अगदी सुरुवातीला आचार्य अत्रे यांचे विधान मी दिले आहे. आता कृतज्ञता का हवी ते सांगतो . कृतज्ञता ही मनाची अशी एक सकारात्मक अवस्था आहे की ज्यात ऊर्जेचा प्रचंड साठा दडलेला असतो. या जगात जो जो चांगुलपणा आपल्याला आढळतो तो कृतज्ञतेच्या भावनेमुळेच असतो. आजोबानी आपल्या पूर्वजांनी लावलेले आंबे खाल्ले असतात म्हणून ते आपल्या नातवासाठी आंब्याचे झाड लावतात. गरिबीत शिक्षण घेऊन मोठी झालेली एखादी व्यक्ती गरीब विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी मोठे कार्य करते. ही सगळी कृतज्ञतेचीच रूपे आहेत. कृतज्ञता व्यक्त करणारे लोक आशावादी, आनंदी आणि उत्साही असतात. अशा लोकांचं मानसिक आरोग्यही उत्तम राहतं. कृतज्ञतेमुळे सकारात्मकता वाढते आणि संकटाना, परिस्थितीला तोंड देण्याची मानसिकता तयार होत जाते. **क्रमशः**



# आनंदी पहाट

## मानसिक स्वास्थ्य अधिक महत्वाचे

आधुनिक केसरी

आपण आपले विचार, विषय किती तार्किक पद्धतीने, अगदी सोप्या भाषेत, सोयीस्कररित्या, न अडखळता, धीटपणाने आणि समोरच्या व्यक्तीला पटतील असे मांडू शकल्यास आपल्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव निश्चितच समोरच्या व्यक्तीवर पडतो. समोरची व्यक्ती बोलत असताना तेवढ्याच शांततेनं, त्या व्यक्तीला ऐकून घेण्याची क्षमता



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सुद्धा आपल्यात असल्यास, आपल्या व्यक्तित्वाला एक आकार, एक वेगळं महत्व मिळू शकतं. मानसिक स्वास्थ्य हे आपल्या भावनात्मक, मानसिक आणि सामाजिक बाबींशी निगडीत असतं. आपण कसा विचार करतो, अनुभवतो आणि कृती करतो? यावर ते अवलंबून असतं. अनेकदा नकळत आपल्या अंतर्मनावर ताण येत असतो, तो जाणवत नाही आणि म्हणूनच कळतही नाही. अशावेळी आपल्या क्रिया आणि प्रतिक्रिया अनावधानानं बदलत जातात. त्यामुळे घेतलेले निर्णय आणि त्या दरम्यान इतरांशी होणारे आपले संवाद काहीवेळा विपरीत परिणाम करणारे ठरू शकतात. यासाठीच जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर अगदी बालपणापासून वृद्धार्पणापर्यंत मानसिक स्वास्थ्य महत्वाचं असतं. आपल्या जीवनात आपण मानसिक स्वास्थ्यविषयक समस्यांचा सामना करत असलो, तर आपली विचारसरणी, अंतर्मनाची भावना आणि वागणूक ह्या सर्वांवर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो.

मानसिक स्वास्थ्यासाठी समस्या निर्माण करणारे नकारात्मक विचार जरी ते सामान्य आहेत असं वाटत असलं तरीही सकारात्मक विचारांच्या माध्यमातून आपण निश्चितच परिवर्तन घडवून आणू शकतो. आपल्या व्यक्त होण्यातून आपलं व्यक्तिमत्वाचं वेगळेपण त्यांतच सामावलेलं असतं. आपल्या मनांत येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते.



आधुनिक केसरी

## थकली रे काया | संसारात ||

काय करू देवा | आणीक सायास
मिटली रे आस | देहाची ह्या ||१||
मना लागे ओढ | तुझ्या चरणाची ||
मज पामराची | काकुळती ||२||
क्षुधा-तृष्णा सारी | हरपून गेली ||
भ्रांत ना उरली | तुजवीन ||३||
चिंतनी चिंतन | क्षणोक्षणी चाले ||
संदेह निमाले | अंतरीचे ||४||
धाव धाव आता | धाव विठुराया ||
थकली रे काया | संसारात ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी

## मायमहाकालीनमन

विकराल रूप काली। गळां नरमुंड घाली।
भय गगन पाताली। धडधडा माय चाली।।
बहिर्जिव्हा दिगंबरा। विमुक्त केशसंभारा।
शंखहस्ता गदाधरा। सहवेना भार धरा।।
नीलांगीनीलनयनी। रक्षरूधीरप्राशिनी।
रक्षोन्मादविमर्दिनी। भयंकरा संघर्षिणी।।
कवींद्रवरदायिनी। महाकालेश भामिनी।
हासदुःखनिवारिणी। दक्षसज्जनरक्षिणी।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

# भगवंत हाच एकमेव आधार वाटला पाहिजे




आधुनिक केसरी

एक भगवंत सत्य आहे. आपले कुठे चुकत असेल तर ते हेच की, आम्ही प्रपंच सत्य मानतो. फणस कापायला ज्याप्रमाणे हाताला तेल लावावे लागते त्याप्रमाणे, राजकारण घ्या, किंवा प्रपंच घ्या, हरिप्रेमाचे तेल आधी हाताला लावावे. समर्थांनी 'मुख्य हरिकथानिरूपण' असे सांगितले; म्हणजे बाकीच्या गोष्टी आपोआप मागे येतील. आम्ही कर्तेपण मिरवू पाहतो इथेच सर्व बिघडते. हरीचे अधिष्ठान ठेवण्याआधी आम्ही कर्तेपणाचेच अधिष्ठान ठेवतो. लग्नाच्या आधी देवाला नमस्कार करतो, पण पुढे प्रपंचात देवाला विसरतो, हे चुकते. नुसते विषय घातक नाहीत; त्यांच्यात आम्ही आपल्या आवडीने जीव घालतो हे घातक आहे, विषयाच्या ताब्यात जाणे हे घातुक आहे. पण पायाच जर चांगला नाही घातला तर देऊळ कसे टिकावे ? अमुक एका कार्याला कुणाची मदत नको म्हटले, तर आपण जे म्हणू ते व्हायला पाहिजे. ते होत नाही. तेव्हा मदत कोणाची तरी घ्यायचीच, तर मग आपल्यासारख्या बुडत्याचीच घेऊन काय उपयोग ? भगवंताचीच घेतली पाहिजे. आम्ही जर भगवंताजवळ विषय मागितले तर त्याचे फळही घ्यावे लागेल. दुर्योधन आणि अर्जुन भगवंताची मदत मागायला आले. एवढे सैन्य सोडले आणि अर्जुनाने भगवंताला मागितले. दुर्योधनाने जे मागितले तेच नाही का आम्ही आज प्रपंचात मागत ? आमचे कार्याकडे लक्षच नसते, सर्व लौकिकाकडेच असते. 'मी दुसऱ्या कशाचाही नाही' असे म्हटले म्हणजे भगवंताला अनन्य शरण होता येते. 'परमात्मा हवा' ही नाही आम्ही जाणीव करून घेत, 'जग हवे' असे म्हणतो; आणि तिकडे, सर्व जग मला नावे ठेवते असेही म्हणतो ! मी म्हणतो, जगाला नावे ठेवू द्या, पण राम काय म्हणतो इकडे पाहणे जरूर आहे. आपण परमेश्वराचे परमेश्वरालाच दिले तर कुठे बिघडले ? जो दिसत नाही, भासत नाही, त्याचे हे सर्व आहे असे म्हणण्यात कुठे बिघडते ? ते म्हणण्यात जे समाधान मिळते ते नाही आम्हाला समजत. खरोखर परमात्मा साक्षात कल्पवृक्ष आहे. आपण नेहमी चिंता वाहतो, म्हणून तो आपल्याला चिंताच देतो. आपण जर त्याच्याकडे आनंद मागितला तर तो आपल्याला आनंदच देईल. भगवंताचा आनंद हा फार बलवत्तर आहे. तो एकदा मिळाल्यावर प्रपंचातल्या लाभहानीचे महत्त्व नाही. राम हा त्रैलोक्याचा स्वामी आहे, आपण त्याचे सेवक आहोत. पण आम्ही नोकरी दुसऱ्याची करतो आणि पगार मात्र रामाजवळ मागतो ! तसे करू नये. खरे-खुरेच रामाचे दास व्हावे. ज्ञान, योग, प्राणायाम वगैरे भगवंतावाचून येऊ शकेल, पण भक्ति मात्र भगवंतावाचून येणार नाही. भक्ति ही भगवंताची देणगी आहे.

प्रपंच करणे हा आपण स्वार्थ म्हणतो. पण तो खरा स्वार्थ नाही; खरा स्वार्थ भगवंताचे होण्यात आहे.

# अध्यात्म आणि विज्ञान




आधुनिक केसरी

अध्यात्मवादी तत्त्वज्ञानाची मूलप्रेरणा मानवाला या अफाट, प्रतिकूल जगात दिलासा देणे ही असल्यामुळे ते मानवाला अनुकूल, मानवाचा मोठेपणा प्रतिपादणारे निष्कर्ष सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत असते. परंतु त्याचमुळे अध्यात्माची युक्तिवाद-पद्धती पूर्वग्रहदूषित होते. अमुक प्रकारचेच निष्कर्ष प्रस्थापित करायचे असे एकदा ठरले की त्या निष्कर्षाला पोषक अशा गोष्टींवरच लक्ष केंद्रित होणे, आणि त्याला प्रतिकूल अशा गोष्टींकडे दुर्लक्ष होणे अपरिहार्य आहे. हे जाणूनबुजून केले नाही, तरी ते होणे स्वाभाविक आहे. तसेच युक्तिवादांत दिला जाणारा पुरावा संशयातीत आहे की नाही याकडे दुर्लक्ष होऊन सापडेल त्या पुराव्यावरून निष्कर्ष काढण्याची प्रवृत्ती वाढीला लागते, आणि त्याचप्रमाणे दिलेल्या पुराव्यावरून नेमके काय सिद्ध होते याचेही भान न राहून आपल्याला इष्ट असे मोठ्या आशयाचे निष्कर्ष सिद्ध होतात असे समजण्याची वृत्ती बळावते. उदा. मानवाचे अल्पजीवित्व, त्याची अत्यल्प शक्ती, त्याचा अटळ मृत्यू, आणि त्याचे विश्वातील अतिक्षुद्र, शून्यप्राय स्थान – या सर्व गोष्टी त्याला फार अप्रिय आहेत, म्हणून त्या खऱ्या नाहीत, केवळ भ्रामक आहेत असे दाखविले पाहिजे. हे दाखविण्याकरिता वापरण्यात येणारे युक्तिवाद अतिशय फसवे, शब्दच्छल करणारे, बुचकळ्यात टाकणारे, आणि एकंदरीत अनिर्णायक असतात. त्यात आपल्या युक्तिवादाने नेमके काय सिद्ध होते आहे याची स्पष्ट जाणीव नसते. उलट थोड्याशा पुराव्याने पुष्कळ सिद्ध झाले असे मानण्याची, सुताने स्वर्गाला जाण्याची प्रवृत्ती व्यक्त होते. भाबडेपणा, भोळेपणा, श्रद्धालुत्व यांचा प्रभावही त्यांवर पडलेला असतो. सारांश, अध्यात्मात वापरण्यात येणाऱ्या युक्तिवादांनी इष्ट निष्कर्ष सिद्ध होत नाहीत असेच म्हणावे लागते. अध्यात्मातील युक्तिवादाचे जे मूल्यन येथे केले आहे त्याच्या पुष्ट्यर्थ भारतीय आणि पाश्चात्त्य अध्यात्मातील काही प्रसिद्ध युक्तिवादांचे परीक्षण उदाहरणादाखल संक्षेपाने देतो.

दि. य. देशपांडे

# समर्थवाणी



तेचि जाणावे सज्जन ।
जयां शुद्ध ब्रम्हज्ञान ।।
जववरी देहाची संगती ।
तववरी सगुणी भजती ।।
जाणोनिया सारासार ।
सदा श्रवणी तत्पर ।।
बाह्यत्याग संपादणे ।
अंतर्त्याग निरूपणे ।।
एकनिष्ठ उपासना ।
अतितत्पर भजना ।।
स्वार्थ सांडूनिया देणे ।
नित्य तेचि संपादणे ।।
म्हणे रामी रामदास ।
जया नाही आशापाश ।।

# आरटीओ साहेब जी फॉर्म बंद करा: लाल बावटा रिक्षा युनियन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नंबर नसलेल्या वाळुच्या गाड्या सोडुन एका रिक्षाचलकाच्या चुकीला सर्व रिक्षाचालकांना धरुन 30,000/- रुपयांपर्यंतच्या मेमो देणार्या प्रादेशीक परिवहन अधिकारी विजय काथवले यांना जी फॉर्म बंद करायला सांगुन लाल बावटा रिक्षाचालक मालक युनियनने आरसा दाखवला. याबाबत असे की, जी फॉर्म म्हणजे लाच दिल्याशिवाय आर टी ओ ऑफीस मध्ये कोणतेही काम होत नाही हे माहीत असतांना कोणत्या नैतिकतेने तुम्ही गरीब रिक्षाचालकांना नैतीकतेचा धडा शिकवता असा खडा सवालच लाल बावटा रिक्षाचालक मालक संघटनेच्या शिष्टमंडळाने विचारला आणि आर टी ओ कोठुळे निरुत्तर झाले. मीटरच्या नावाने अन्यायकारक दंड आकारणी बंद करणे व आर टी ओ च्या गलथान कारभाराची शिक्षा रिक्षाचालकाला देणे बंद करण्याच्या मागणीसाठी लाल बावटा रिक्षाचालक मालक युनियन संलग्न आयटक तर्फे आर टी ओ ऑफीससमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. मीटर कॅलीब्रेशन करण्याची प्रक्रीया सुरु आहे, शहरात जवळपास 30 ते 35 हजार रिक्षा आहेत. मीटर दुरुस्ती करणारे अधिकृत तंज्ञ 4-5 आहेत. त्यातील जवळपास 80% हे सुपर कंपनीचे मीटर असल्याने सुपर मीटर रिपेअरिंग कडेच ते द्यावे लागतात, मीटर दुरुस्त करणार्या 4-5 तंज्ञांनी दिवसराञ रिपेअरिंग केले तरीही कमीत कमी एक वर्ष सर्व 30- 35 हजार मिटर रिपेअरिंग साठी लागण्याची शक्यता आहे, मीटर रिपेअरिंग ची व्यवस्था कीती वेळखाऊ आहे हे न बघता सरसकट कारवाई सुरु करणे योग्य नाही. वरील बाबी लक्षात घेता 19/11/022 पासुन आजपर्यंत सुपर रिपेअरिंग व इतरांनी कीती मीटर रिपेअरिंग केले, दिवसाला ते कीती मीटर रिपेअर करु शकतात हे जाणुन न घेता तुमचे अधिकारी रिक्षाचालकांनी न केलेल्या गुन्ह्याची शिक्षा रिक्षाचालकांना कसे देऊ शकता ?
असा आमचा रास्त सवाल आहे. तुमच्याकडे 35 हजार रिक्षांच्या मीटर रिपेअरिंगची व्यवस्था नसतांना तुमचे अधिकारी रिक्षा थांबवुन मीट, दुरुस्त केले आहे का हे बघतात आणि वेगवेगळ्या नावाने दंड आकारणी करतात हे अन्यायकारक आहे.
हा अन्याय थांबला पाहीजे. महागाई वाढत आहे त्याप्रमाणे रिक्षा धंद्यात कमाई वाढत नाही दिवसाला मोठ्या मुश्कीलीने 200/- ,-250/- रुपये कमाई होते, त्यात खाणार काय आईवडीलांना औषध आणणार कसे, मुलांचे शिक्षण , घरभाडे इ देणा, कसे ? याचा विचार तुम्ही करावा. असे असतांना 17000/-, 30000/-, 20000/-, 25000/-, असे दंड आकारणी करीत आहात. अशा परिस्थितीत या अन्याया विरोधात आंदोलना शिवाय पर्याय राहत नाही असे आज दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. या निवेदनात 1) रिक्षाचालकांच्या पोटावर लाथ मारुन त्यांना गुन्हेगारीकडे ढकलु नका, 2) मीटरच्या नावाने अन्यायकारक दंड आकारणी बंद करा,




3) आर टी ओ च्या गलथान कारभाराची सर्व रिक्षाचालकांना शिक्षा देऊ नका या मागण्यांचा समावेश आहे. तसेच मागण्या मंजुर न झाल्यास लाल बावटा रिक्षिचालक मालक युनियन संलग्न आयटक तीव्र आंदोलन छेडेल असा इशाराही निवेदना द्वारे देण्यात आला. यावेळी सिल्लेखाना येथे एका रिक्षाचालकाने मुलीची छेड काढली त्याचाही आणि मोदि सरकारने बिल्कीस बानोच्या दोषी बलात्कार्यांना आरती ओवाळुन सोडुन दिले याचाही निषेध करण्यात आला. स्त्री पुरुष समानतेचे आणि लैगीक शिक्षण शाळेपासुनच हवे तरच अशा घटना घडणार नाहीत असेही मत संघटनेने मांडले, आरटीओने रिक्षा स्टॅन्डवर जाऊन जागृती करावी अशीही मागणी करण्यात आली. यावेळी हप्ते घेणे बंद करा, कॅलीब्रेशन करणार्या कंपनीला मीटर जमा करतांना पावती देण्याचे आदेश द्या, रिक्षाचालकांच्या पोटावर लाथ मारणे बंद करा, बिल्कीस बानोच्या बलात्कार्यांना फाशि द्या, सर्वांना स्त्रि पुरुष समानतेचे शिक्षण द्या इ मागण्यांनी आरटीओ परिसर दणाणुन गेला. यावेळी ॲड. अभय टाकसाळ , अश्फाक सलामी, शेख रफीक अहमद, रफीक बक्श, नसीर नेहरी, शेख फहीम, दादाभाई, राजु हिवराळे यांच्यासह मोठ्या संख्येने रिक्शाचालक उपस्थित होते.




# भडगाव बारी येथे खाजगी बस पलटी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** चालकाच्या निष्काळजीपणामुळे धक्कादायक घटना घडली आहे. भडगाव बारी येथे लग्नाचे वराड चिंचवे ते साक्री घेऊन जाणारी खाजगी बस पलटी झाली असून त्यामध्ये 35 ते 40 वऱ्हाडी होते. त्यात मुले व महिलांचा समावेश जास्त. दोन वयस्कर महिला व दोन लहान मुले नऊ ते दहा वर्ष आतील यांची प्रकृती गंभीर असून सर्व रुग्णांना मालेगाव सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारासाठी पाठवले आहे.

# जिल्हा बँकेच्या वतीने डाभा येथे शेतकरी मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील डाभा येथे औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा सावळदबारा यांच्या वतीने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसाठी हात देणे, हेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ध्येय आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे काटेकोर नियोजन व धोरणामुळे ही परिस्थिती सुधारली.अशी माहिती शेतकऱ्यांना नामदेव मानसिंग चव्हाण यांनी शेतकऱ्यांना दिली. 'शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसाठी हात देणे, हेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ध्येय आहे. आगामी काळात ग्राहकांना, शेतकऱ्यांना अधिकाधिक सुविधा देण्यासाठी बँकेच्या आणि नवीन तंत्रज्ञान वापरावर भर देऊ,' शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खाते उघडून शेतकऱ्यांनी आपला नेहमीत व्यावहार केला पाहिजेत अशी माहिती रत्नाकर ऊमरे यांनी ग्रामस्थांना बोलताना दिली. बँकेची आर्थिक स्थिती, भविष्यातील योजनांसह विविध विषयावर शेतकऱ्यांच्या सोबत सविस्तर चर्चा केली. यावेळी प्रदीप रोकडे म्हणाले, 'ग्रामीण भागातील लोकांसाठी, शेतकऱ्यांसाठी जिल्हा सहकारी बँक हा अंत्यत जिव्हाळ्याचा विषय आहे. अडीअडचणीत बँकेकडून होणारी मदत हे



त्यामागील कारण. ही बँक सभासद-शेतकऱ्यांच्या पाठबळामुळे आज प्रगतीपथावर आहे. अशा विविध योजना विषयांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. याप्रंसगी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कर्मचारी नामदेव मानसिंग चव्हाण, प्रदीप रोकडे, रत्नाकर हुंबरे, सुखदेव गवळे,करणार चव्हाण, सरपंच राहुल हेलोडे, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ व शेतकरी मेळाव्यामध्ये मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वॉटर व संजीवनी संस्थानिर्मित फार्म प्रिसाईज ॲप कीड व रोग फोटो स्पर्धा बक्षिस वितरण



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जाफराबाद वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट (वॉटर) व संजीवनी सक्षमीकरण आणि विकास संस्था औरंगाबाद यांच्या विद्यमाने फार्म प्रिसाईज ॲप च्या माध्यामातून खरीप हंगाम २०२२ मध्ये किड व रोग फोटो स्पर्धा बक्षिस वितरण कार्यक्रमाचे आयोजन जाफ्राबाद येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमास वॉटर संस्थेचे विध्याधर कोंडे, सचिन आडे, गणपत कबाडी, अनिकेत शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमामध्ये स्पर्धेतील विजेत्यांस प्रथम क्रमांकाचे पारितोषिक फोरस्ट्रोक पेट्रोल इंजिन स्प्रे पंप २० लिटर क्षमता, भागीनाथ बाबासाहेब आसने ब्राम्हणगाव ता.कोपरगाव जि.नगर, दुतीय पारितोषिक चार्जिंग स्प्रे पंप १५ लिटर क्षमता ज्ञानेश्वर बापूराव आदबाने चिंचोली, ता.भोकरदन,तृतीय पारितोषिक चार्जिंग स्प्रे पंप १५ लिटर क्षमता, गोपाल गजानन जाधव बोरी खुर्द,महादू विष्णू काकडे सोनखेडा ता.जाफ्राबाद यांना आणि उत्तेजनार्थ १० विजेत्यांस शेती उपयोगी ताडपत्री साईज १८बाय२४ पारितोषक वितरीत करण्यात आले.यावेळी मार्गदर्शन करताना विध्याधर कोंडे यांनी फार्म प्रिसाईज ॲपची ठळक वैशिट्य जसे की हवामानाचा अंदाज, कृषी सवांद, किड व रोग व्यवस्थापन, खताचे कॅंलक्यूलेटर, फार्म डायरी, बाजार भाव आणि पिक निहाय शेतीविषयक सल्ला इत्यादी माहिती निशुल्क मिळते त्यासाठी जास्तीत जास्त शेतक-यांनी ॲप चा वापर करून शेतीचे तंत्रसुद्ध व्यवस्थापन करावे तसेच किड व रोग फोटो स्पर्धेची संकल्पना सांगताना विध्याधर कोंडे म्हणाले कि पिकावर पडणा-या रोगांची आणि किडींची ओळख शेतक-यांना व्हावी आणि शेतक-यांनी पिकाचे नियमित निरीक्षणे करून किडीचा जीवनक्रम,पिकाला होणा-या रोगांची लागण कश्या प्रकारे होते हे समजून घेता येईल.यासाठी या फोटो स्पर्धे मध्ये शेतक-यांनी भाग घेऊन किड आणि रोगांचे फोटो घेतल्या मुळे त्या पिकावर येणा-या किड व रोगांची त्याच बरोबर आपल्या पिकांमधील अन्नद्रव्यांची कमतरता आणि त्यावरील उपाय योजना त्यांच्या लक्षात येईल.



# बेरोजगारीचा उच्चांक

आधुनिक केसरी

करोना नंतर देशासमोर उभ्या थकलेल्या अनेक समस्यांपैकी एक म्हणजे बेरोजगारी. करोनाचा जोर ओसरून अजूनही देशात रोजगाराची स्थिती सुधारलेली दिसत नाही. 'सेंटर फॉर मॉनिटिरग इंडियन इकोनॉमी'ने (सीएमआयई) ने गुरुवारी जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार नोव्हेंबरमध्ये देशात बेरोजगारी दर ८ टक्के नोंदविण्यात आला आहे. ऑक्टोबरच्या तुलनेत देशातील बेरोजगारीच्या ७.७७ टक्क्यांच्या तुलनेत आणखी वाढ झाली आहे. मागील तीन महिन्यातील आकडेवारी पाहता बेरोजगारीच्या देशाने उच्चांक गाठला आहे. 'सेंटर फॉर मॉनिटिरग इंडियन इकोनॉमी'ने (सीएमआयई) ही आकडेवारी जाहीर केली आहे. त्यानुसार शहरी भागात बेरोजगारी अधिक असल्याचे स्पष्ट झाले आहे. शहरांमध्ये बेरोजगारीचा दर ८.९६ टक्के, तर ग्रामीण भागात ७.५५ टक्के आहे. ऑक्टोबरमध्ये हा दर अनुक्रमे ८.०४ टक्के आणि ७.२१ टक्के होता. हरियाणा राज्यात बेरोजगारीचे प्रमाण सर्वाधिक ३०.६ टक्के इतके नोंदवण्यात आले आहे तर टॉप ५ राज्यांमध्ये णजेच राजस्थान (२४.५ टक्के), जम्मू-काश्मीर (२३.९ टक्के), बिहार (१७.३ टक्के) आणि त्रिपुरा (१४.५ टक्के) ही सर्वात खराब कामगिरी करणारी राज्ये ठरली आहेत. यापाठोपाठ मेघालय (२.१ टक्के), कर्नाटक (१.८ टक्के), ओडिशा (१.६ टक्के), उत्तराखंड (१.२ टक्के) तर सर्वात कमी बेरोजगारीचा आकडा हा छत्तीसगढ (०.१ टक्का) मध्ये पाहायला मिळत आहे. सीएमआयईच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राचा बेरोजगारी दर नोव्हेंबरमध्ये ३.५ टक्के नोंदवण्यात आला आहे. याआधीच्या दोन महिन्यांमध्ये महाराष्ट्रात अनुक्रमे ४ टक्के आणि ४.२ टक्के बेरोजगारीचा दर होता. राज्याच्या शहरी भागांमध्ये बेरोजगारी दर ४.८ टक्के आणि ग्रामीण भागात २.८ टक्के असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, मागील वर्षभरातील आकडेवारी पाहायला गेल्यास ऑगस्ट २०२२ मध्येदेशातील बेरोजगारीची टक्केवारी यंदाची सर्वाधिक म्हणजेच ८. २८ इतकी नोंदवण्यात आली होती मात्र मागील दोंन महिन्यापासून हा टक्का खाली आला होता. मात्र नोव्हेंबर महिन्यात पुन्हा एकदा बेरोजगारीच्या टक्केवारीत वाढ झाली आहे.

# ५जी तंत्रज्ञान, नव्या क्रांतीची वाटचाल



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**संदेश दळण वळण क्षेत्रात लवकरच ५जी तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे. त्याचा देशाला,सामान्य नागरिकांना,उद्योग क्षेत्राला,आर्थिक प्रगतीला काय अन् कितपत लाभ होणार हे समजून घेणे महत्वाचे आहे.५जी मधील जी चा अर्थ जनरेशन असा आहे.कोणतेही तंत्रज्ञान नेहमी टप्प्या टप्प्या ने प्रगत होत असते.म्हणजे तंत्रज्ञानाच्या देखील जनरेशनस ,पिढ्या असतात.सुरवातीला १जी ते ५जी हा मनोरंजक प्रवास आपण जाणून घेऊ.१जी चे फोन्स आकाराने,वजनाने मोठे होते. त्यांचा वापर देखील मर्यादित क्षेत्रा पुरता,प्रोफेशनल कामासाठीच मर्यादित होता.हे सारे १९८०सालापासून सुरू झाले.**

१९९०साली आलेले २जी व्हॉईस कॉल पुरते अन् छोट्या संदेश वहन एसएमएस पुरते मर्यादित होते. २०००साली ३जी मोबाईल,इंटरनेट,वेब शोधनासाठी वापरात आले. २०१०साली आलेले ४जी ऑडियो, व्हिडिओ, संदेश वहना बरोबर वेतेल तितका डेटा पाठविण्याची,साठविण्याची सोय झाली. डेटा पाठविण्याची क्षमता, गती दोन्हीत वाढ झाली. आता येऊ घातलेले ५जी तंत्रज्ञान संदेश वहन क्षेत्रात नवा चमत्कार म्हणावा या अर्थाने सर्व बाबतीत अत्याधुनिक असणार. इंटरनेट ऑफ थिंग्ज, संपूर्ण डीजिटायझेशन, भरपूर फ्रिकवेंसी ब्यानड विडथ,अशा वैशिष्ट्य पूर्ण अंगांनी समृद्ध असणारे हे तंत्रज्ञान भरपूर माहिती, जास्तीत जास्त वेगाने, संगणकाच्या माध्यमातून आदान प्रदाना साठी सक्षम असेल. सध्या जास्त पेजेस, LONGDOCUMENTS, JAST फोटोज्,जादा लांबीचे व्हिडिओपाठविण्यात अडचणी येतात. वेळही वाया जातो. हे आपण अनुभवले आहे.५जी मध्ये या मर्यादा राहणार नाहीत. इथे मिली मीटर वेव्ह स्पेक्ट्रम चा उपयोग करण्यात आल्यामुळे जास्त क्षेत्रफळ संपर्क क्षेत्रात येईल. शिवाय संदेश वहनाचीगती अन् संचार क्षमता किती तरी पटीने वाढली असेल.

३जी मध्ये डेटा रेट ३८४KBPS एव्हढा होता.या नंतर इंटरनेट बरोबर व्हिडिओ कॉल सुरू झाले. त्यामुळे डाऊनलोड, अपलोड करण्याचा वेग वाढविण्याची गरज निर्माण झाली.४जी मध्ये डेटा रेट बऱ्याच प्रमाणात वाढले. कारण या काळात फायबर ओप्तिक चे जाळे अन् वेगवान काम करणाऱ्या सेमी कंडक्टर चिप्स निर्माण झाल्या. या तंत्रात गाडीतून चालणाऱ्या ग्राहकांसाठी डेटा रेट १००MBPS एव्हढे होते. त्यामुळे बुलेट ट्रेन मध्ये देखील ४जी फोन उत्तम चालायचे.




आता ५जी ची भाषा सुरू झालीय. त्यामध्ये ५GBPSएव्हढा प्रचंड डेटा रेट असणार .जसजसे लाखो, करोडो मोबाईल, संगणक, अन् इंटरनेट ऑफ थिंग्ज, IOT, अशी उपकरण इंटरनेट ला जोडायला लागली अन् कृत्रिम बुद्धिमत्ता, वर्चुअल रियालिटी, अन् इतर एप्लिकेशनस निर्माण झालीत,तशी जास्त फ्रिकवेन्सी ब्यांड विडथची गरज भासायला लागली.५जी हा ४जीच्यातुलनेत १००पटीने जास्त ट्रॅफिक हाताळू शकेल.५जी साठी ५तंत्र विकसित केली जाताहेत.मिली मीटर वेव्हज, स्माल सेल्स, म्यासिव मायमो, बीम फॉर्मिंग, अन् फुल डुप्लेक्स ही ती पाच तंत्र आहेत.

जसजसे जास्ती फोन्स, नवी उपकरण जोडली जाताहेत,तशा पूर्वीच्या वापरातल्या फ्रिकवेन्सी कमी पडायला लागल्या.त्यात ट्रॅफिक जाम म्हणजे गर्दी व्हायला लागली.त्यामुळे ३०GHZ ते ३००GHZ हा स्पेक्ट्रम वापरायची गरज निर्माण झाली. या फ्रिकवेंसीची तरंग लांबी म्हणजे वेव्ह लेंगथ मिली मीटर पेक्षा कमी असते. पण या फ्रिकवेंसी वापरताना मोठ्या इमारती झाडे असे अडथळे आले की समस्या निर्माण होते. म्हणून सेलचा आकार कमी ठेवावा लागतो.सेलचा आकार कमी झाल्याने कमी ऊर्जा लागते.कमी पॉवर वापरता येतो हा फायदा.५जी मध्ये अंटेंना ची संख्या वाढेल. त्यामुळे नेटवर्क ची क्षमता २०-२५ पटीने वाढेल. बीम फोर्मिंग या तंत्रामुळे,संदेश,सिग्नल, चहू बाजूला, सर्व दिशांना न पसरता, आपल्याला पाहिजे त्याच दिशेला पाठवता येईल. त्याने स्पष्टता वाढेल. भारताने एअरटेल, वोढाफोन, जिओ,एम टी एन एल यांनाचाचण्यासाठीपरवानगी दिलीय.

५जी मुळेरोग प्रतिकार शक्ती कमी होते हा एक गैर समज. त्यात फारसेतथ्य नाही. कारण ऊर्जा, पॉवरफार कमी लागत असल्याने कसलाही धोका नाही. ५जी आल्याने मोबाईल, इंटरनेट, असं सगळच जग आरपार बदलेल. भारतात डिपार्टमेंट ऑफ टेली कामुनिकेशन ने २०२२साली ५जी सेवा १३शहरात उपलब्ध होतील असं जाहीर केलं आहे.स्मार्ट सिटीच्या प्रकल्पासाठी, ड्रायवर लेस कार साठी,रोबोटिक शस्त्र क्रियेसाठी या तंत्राचा उपयोग होईल. अन् अनेक क्षेत्रात क्रांतीची बीजे रोवली जातील. २०२०सालात जागतिक स्तरावर १२टक्के मोबाईल कनेक्शन हे ५जी चा वापर करतील.


मोबाईल बँकिंग, आरोग्य सेवा या क्षेत्राचा चेहरा मोहराच येत्या काळात बदललेला दिसेल. यामुळे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. आर्थिक उलाढाल वाढेल. आधुनिक शेती, स्मार्ट फार्मिंग साठी देखील ५जी चा लाभ घेता येईल. आपल्या पुढे आव्हान असेल ते लवकरात लवकर जास्तीत जास्त लोकांपर्यंत अन् जास्तीत जास्त शहरात, गावात या ५जी वर अधरित्त तंत्राचे जाळे पसरण्याचे. येत्या दशकात संदेश वाहनाच्या या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे नवी उद्योग, आर्थिक, सामाजिक क्रांती घडणार हे निश्चित..




# मन साफ करण्याचे ध्यान हे उत्तम साधन

आधुनिक केसरी

**आपल्याला साजरे करण्यासाठी कोणतेही कारण पुरेसे आहे. हा आपला स्वभाव आहे. नवीन वर्ष सुरू होताना सगळे जग उत्सवाच्या उत्साहात असते. सरत्या वर्षाकडे वळून पाहण्याची आणि आपण काय शिकलो, याचा हिशेब मांडण्याची ही संधीही असते. आयुष्यात गोष्टी शिकायच्या आणि विसरून जायच्या असतात. शिकायचे याच्यासाठी की त्याच त्याच चुका पुन्हा होऊ नयेत आणि विसरायचे यासाठी की त्यांच्यामुळे तुम्ही खचून जाणार नाही. त्याचबरोबर हेही लक्षात ठेवायला हवे, की आणखी बरेच काही करायचे आहे.**



लोक मला नेहमी विचारतात की भविष्य कसे दिसते? मी त्यांना सांगतो, 'भविष्य हवे तसे त्यांनी घडवायचे आहे. मूर्ख लोक भूतकाळाबद्दल पश्चात्ताप करत बसतात, भविष्य म्हणजे दैव आहे असे समजतात आणि वर्तमान बिघडवून टाकतात. शहाणे लोक त्यांचा भूतकाळ हे दैव आहे, असे मानतात. भविष्य म्हणजे त्यांची मर्जी असे समजतात आणि वर्तमानात आनंदी असतात. सरत्या वर्षात घडलेल्या घटना त्या वेळी कितीही महत्त्वाच्या असल्या तरी मागे वळून पाहिल्यानंतर केवळ स्वप्नवतच वाटतात. त्या घटनांचा विचार केल्यास त्यांचे अश्वस्त रूपच दिसून येते. घटना या सतत वाहत राहणाऱ्या काळरूपी नदीतील दगड, गोटे असतात. आपण घटना आणि परिस्थिती यांनी भरलेल्या बाहेरच्या जगात राहतो, तसेच आपण भावभावनांच्या आतल्या जगातही राहतो, याची बरेचदा आपल्याला जाणीव नसते. तुम्हाला खचून जायला लावणाऱ्या भूतकाळातील संस्कारांना पुसून टाकून तुमचे मन साफ करण्याचे ध्यान हे उत्तम साधन आहे. बाहेरच्या आणि आतल्या जगातील अंतर केवळ निमिषार्धाइतके आहे. बाहेरच्या जगात क्रियाशील असताना आतल्या जगावर लक्ष ठेवण्याचे कसब योगामध्ये आहे. तुम्ही बाहेरच्या जगात हरवून जाता तेव्हा आतल्या जगात युद्धासारखा गोंधळ असतो. त्याचप्रमाणे, तुम्ही आतल्या जगात दृढ असता तेव्हा बाहेरचे जग आणि जीवनात स्पष्टता येते. जीवन एखाद्या खेळासारखे होऊन जाते.

**-श्री श्री रविशंकर**

# फोनमधून लगेच डिलीट करा हे डेंजरस ॲप

आधुनिक केसरी

वाढत्या वापरामुळे स्मार्टफोन्स आता प्रत्येकासाठी आवश्यक झाले आहेत. पण, फोन जितका महत्त्वाचा आहे तितकाच तो काही वेळा धोकादायकही ठरू शकतो. कारण, युजर्स अनेकदा आपल्या फोनवर असे काही ॲप्स डाउनलोड करतात जे पुढे जाऊन नुकसान पोहचवू शक्तात. . या ॲप्सद्वारे हॅकर्स युजर्सची आयुष्यभराची कमाई चोरू शकतात. आजकाल हॅकर्स युजर्सची डेटा मिळविण्यासाठी अनेक युक्त्या वापरत असल्याचे दिसून येत आहे. अँड्रॉइडमध्ये असलेले काही ॲप्स खूप धोकादायक आहेत. आणि आज आम्ही अशाच आणखी १३ ॲप्सबद्दल सांगणार आहोत जे तुमच्या फोनसाठी खूप धोकादायक ठरू शकतात. या यादीतील सर्व ॲप्स मालवेअरने प्रभावित आहेत. हे केवळ तुमचे पैसेच नाही तर तुमची वैयक्तिक माहिती देखील चोरू शकते. सूची पहा. या यादीमध्ये जंक क्लीनर, कीप क्लीन, कार्पेट क्लीन, क्विक क्लीनर, इझी क्लीनर, पॉवर डॉक्टर, कूल क्लीन, विंडी क्लिन, METEOR CLEAN, सुपर



क्लीन, स्ट्राँग क्लीन, फिंगरटिप क्लीनर, फुल क्लीन-क्लीन कॅशे यांचा समावेश आहे. या 13 APPS पैकी काही ॲप्स तुमच्या फोनमध्ये असतील तर, ते आता डिलीट करा. अन्यथा तुमचे डिव्हाइस हॅक केले जाऊ शकते. हे ॲप्स फोनमध्ये ठेवणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. तसेच तुमच्या सर्व खात्यांचे पासवर्ड त्वरित बदला. तुम्ही असे न केल्यास, तुमच्या वैयक्तिक माहितीसह तुमचे पैसे चोरीला जाऊ शकतात. हे देखील लक्षात ठेवा की, कोणत्याही THIRD PARTY प्लॅटफॉर्मवरून ॲप डाउनलोड करू नका. याशिवाय कोणतेही APP पडताळल्याशिवाय डाउनलोड करू नका. ॲप डाउनलोड करण्यापूर्वी, त्याच्या डेव्हलपरबद्दल आणि रिव्ह्यूबद्दल पूर्णपणे वाचा.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# श्रीमद् भगवद्गीता : आनंदी जीवनाची गुरुकिल्ली !



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**ऐतिहासिक दस्ताऐवज, समृद्ध प्राचीन संस्कृती आणि तत्वज्ञानाच्या विविध वाङ्ग्यीन कलाकृतींच्या आधारे जगाच्या इतिहासात सर्वकाळ मोठ्या सन्मानाने भारताची नोंद घेतली जाते ही अत्यंत अभिमानाची, गौरवाची बाब म्हणावी लागेल! चारवेद, सहा शास्त्रे, अठरा पुराने, उपनिषदे, रामायण, महाभारत, महात्मा बुद्धांचे तत्वज्ञान, महर्षी पतंजलीकृत योगसूत्र आदि प्राचीन संस्कृत ग्रंथांबरोबरच प्राकृत भाषेत अनेकविध ग्रंथ निर्मिती होऊन इथला ज्ञानस्त्रोत अखंड प्रवाही ठेवण्याचे काम अनेक महानुभाव संत-तत्वज्ञांनी केल्याचा इतिहास सर्वश्रुत आहे. या सर्वच ग्रंथातील संपूर्ण जगभर लोकप्रिय असलेला, सर्वश्रुत ग्रंथ म्हणजे श्रीमद् भगवद्गीता!**

स्त्री, सत्ता, संपत्ती, युद्धनीती, तत्वज्ञान आदींनी ओतप्रोत महाभारत ग्रंथाच्या युद्धकांडातील भिष्मपर्वातील केंद्रस्थानी असलेला भाग म्हणजे श्रीमद् भगवद्गीता! श्रीमद् भगवद्गीताम्हणजे श्रीकृष्ण-अर्जुन यांचा अलौकिक संवाद! एकूण ७०० श्लोक असलेल्या या अलौकिक संस्कृत ग्रंथातील सर्वच्या सर्व १८ अध्याय म्हणजे मानवी जीवन जगण्याचे अद्भुत तत्वज्ञान विषद करणारा १८ भागांतील नितांत सुंदर ग्रंथ! प्राचीन कालखंडापासून सांप्रत काळापर्यंत अनेक तत्ववेते प्रस्तुत ग्रंथाच्या विषय-आशयाकडे आकर्षित झाले. या मध्ये आदि शंकराचार्यांनी 'गीता भाष्य', संत ज्ञानदेवांनी 'श्री ज्ञानेश्वरी', श्री भक्तिवेदान्त स्वामी प्रभुपादांनी 'श्रीमद्भगवद्गीता यथारूप', लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचा 'गीतारहस्य', महात्मा गांधींचा 'अनासक्ती योग', विनोबांचा 'गीताई', गोयंकांचा 'गीता तत्व विवेचनी' आणि स्वामी रामसुखदासांचा 'तत्व संजीवनी' इत्यादी महत्वपूर्ण ग्रंथ या चिंतकांनी लिहिले आहेत. यातील बहुतांश नावे ज्ञान-अध्यात्म क्षेत्रातील अध्वर्यू असून त्यांचे कार्य सर्वाभिमुख आहे हे विसरून चालणार नाही.

मंडालेच्या तुरुंगात टिळकांनी लिहिलेला 'गीतारहस्य अर्थात कर्मयोग शास्त्र'मध्ये ग्रंथाचा महिमा विषद करतांना ते लिहितात, "गीता हा निवृत्तीप्रधान ग्रंथ नसून तो श्रेष्ठ कर्मप्रधान ग्रंथ आहे. अधिक लिहायचे म्हणजे गीतेमध्ये 'योग' शब्दच 'कर्मयोग' अधिक विस्ताराने आला आहे." लोकमान्य टिळकांनी गीतेवरील ग्रंथात प्रामुख्याने कर्म सिद्धांताचे प्रतिपादन केले असून त्याद्वारे हा ग्रंथ मानवाचे दैनंदिन जीवन कसे सुकर करतो, दररोज येणाऱ्या संकटांना सामोरे जाण्यास मानवास कसे बळ प्रदान करतो याचे विवेचन केले आहे. गीताशास्त्रानुसार माणसाने प्रथमतः परमेश्वराच्या शुद्ध-सात्विक स्वस्वरुपाची ओळख करून घेऊन आपले मन-बुद्धी निर्मळ-पवित्र करून घ्यावी. आपल्याच माणसांना धनुष्य घेऊन मारायला निघालेल्या अर्जुनाला केवळ युद्ध करण्यास प्रवृत्त करणारा हा ग्रंथ नसून 'कधीही कर्म माणसाला सोडत नसून ते सोडू सुद्धा नये' असा ज्ञानमुलक भक्तिप्रधान कर्मयोग सिद्धांत गीतेमध्ये प्रतिपादित झाल्याचे लोकमान्य टिळक लिहितात.

याशिवाय विनोबा भावेंनी 'गीताई' नावाने गीतेवर प्रवचने दिली आहेत. विनोबा गीतेला आई संबोधतात. आपल्या गीताई ग्रंथाच्या कर्मयोग या तृतीय अध्यायात विनोबा कर्माच्या अनुषंगाने आईच्या दोन ओळी आणि इतरांनी लिहिलेल्या निबंधाची तुलना करून 'आईच्या चार ओळी आयुष्याचे कल्याण करून जातात' तद्वतच कर्म श्रद्धेने केल्यास ते फलित होतेच, कधीही कर्मच श्रेष्ठ असून "कर्मामुळे त्याची शरीरयात्रा चालून देह व बुद्धी सतेज राहतात आणि समाजाचेही कल्याण होते. या दोन फळांशिवाय चित्तशुद्धीचेही महान फळ त्याला मिळते. यास 'कर्मणा शुद्धीः' असे म्हटले आहे. कर्म चित्तशुद्धीचे साधन आहे." असे एक ना अनेक दृष्टांत आणि सिद्धांत देऊन गीता ही कशी संपूर्ण मानवजातीची आई असून आपल्या लेकरांची लडिवाळपणे ज्ञान-भक्ती-वैराग्य प्रांतात आपापल्या श्रेष्ठ कर्माने संगोपन करते याचे सहज-सोपे-सुंदर विवेचन केलेले आढळते. विनोबा भावेंच्या जीवनात सर्वकाळ प्रकाशमान आणि नित्य प्रवाही असणारीश्रीमद् भगवद्गीता त्यांच्या प्रत्येक कृतीतून सहजतेने प्रतिबिंबित होतांना दिसते.

श्रीमद्भगवद्गीतेवरील ग्रंथांचे अवलोकन केले असता अलंदीप संतश्रेष्ठ ज्ञानदेवकृत भावार्थदीपिका अर्थात ज्ञानेश्वरी मात्र गीतेचा सर्वोच अलंकार असून सामान्य माणसांच्या हातात ज्ञानदेवांनी परीस देऊन त्याच्या क्षणाक्षणाच्या जगण्याचे जणू सोनेच केले आहे! ज्ञानेश्वरी गीतेची



केवळ टीका नसून संत नामदेवांच्या भाषेत
**गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंदलहरी प्रगट केली ॥**
हा अभंग लिहून "नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एकतरी ओवी अनुभवावी॥" असे प्रतिपादन करतात. संत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीवरील टीका लिहितांना त्यांच्या समोर केवळ एकच उद्देश होता आणि तो म्हणजे सामान्य माणसांना बंदिस्त असलेलं गीतेतील अलौकिक तत्वज्ञान सहजतेने उपलब्ध करून इथला प्रत्येकजण सुखी-आनंदी-समाधानी होऊन त्याने आपला भोवताल आनंदी करावा. याच अनुषंगाने संत ज्ञानदेवांचे समकालीन संत चोखोबा महाराज
**संसारी आसक्ती माया मोहे रत। ऐसे जे पतित तारावया॥**
**चोखा म्हणे श्रेष्ठ ज्ञानदेवी ग्रंथ। वाचिता सनाथ होती जीव॥** अशा ओव्या लिहून अनाथ हृदयात सनाथ भावना रुजविण्याचे महान कार्य गीतेवरील टीकात्मक ज्ञानेश्वरी ग्रंथाने केलेले आढळून येते. सामान्य जनासाठी उच्च कोटीतील वेदार्थांचा ठेवा ज्ञानेश्वरी ग्रंथरूपाने मागे ठेवला आहे ही निश्चितपणे आपल्यासाठी गौरवपूर्ण बाब आहे. ज्ञानेश्वरी जरी वारकरी संप्रदायासाठी प्रस्थानत्रयी असली तरी तो गीतेवरील सर्वांग सुंदर समीक्षाग्रंथ आहे. एखाद्या ग्रंथाचे भाषांतर अथवा समीक्षण कसे असावे( ?) याचे सुंदर उदाहरण म्हणजे ज्ञानेश्वरी होय! प्राकृत भाषेतील श्रीमद् भगवद्गीतेवरील विविध ग्रंथांपैकी ज्ञानेश्वरीहा सर्वात सुंदर ग्रंथ असून याद्वारे ज्ञानदेवांनी मराठी भाषेची सेवा केली आहे यात तिळमात्र शंका नाही.

गीता असो की गीतेवरील ज्ञानेश्वरी असो, हे दोन्ही ग्रंथ मानवाच्या समग्र उत्थानाचे महत्वपूर्ण ग्रंथ आहेत. याच अनुषंगाने मामासाहेब दांडेकर लिहितात, "ज्ञानदेवांनी ज्ञानदेवीत अध्यात्मज्ञानाचे अन्नछत्र घातले. गीता हा जीवनाचं ग्रंथ आहे, असे ज्ञानदेव समजत होते. म्हणूनच उच्च प्रकारचे जीवन कसे व्यतीत करावे याची त्यात प्रामुख्याने चर्चा आहे." गीता हा श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असून श्रीकृष्णाने गीतेच्या माध्यमातून अर्जुनाला जीवनाच्या अत्युच्च भूमिकेवर आणून बसविले आहे. लढाई लढायला लावून अर्जुन माया-मोहाच्या पलीकडे गेला. त्याच्यामध्ये स्थितप्रज्ञता दृढ करण्याचे महत्कार्य श्रीकृष्णाने केलेले आढळून येते. आज भोवताल अनंत समस्यांनी ग्रासलेला असून समाजालाश्रीमद् भगवद्गीतेच्या तत्वांची नितांत आवश्यकता असल्याचे वाटते. गीता माणसाच्या जीवनात निरपेक्ष विचारांना प्राधान्य द्यायला भाग पाडते. श्रीमद् भगवद्गीता हा एखाद्या धर्म, जात अथवा पंथासाठी लिहिलेला ग्रंथ नसून संपूर्ण मानव जातीचे कल्याण आणि त्याला दैनंदिन जीवनात पडणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे सहज उपलब्ध व्हावीत या उद्देशाने या निर्माण झालेला महान ग्रंथ आहे! याच अनुषंगाने राष्ट्रपिता महात्मा गांधी गीतेविषयी, "मी जेंव्हा जेंव्हा अत्यंत गंभीर संकटात असतो तेंव्हा मी गीता मते जवळ जातो आणि गीता मातेने माझे समाधान केले नाही असे केंव्हाच झाले नाही" असे लिहून या ग्रंथाचे श्रेष्ठत्व सिद्ध करतात. अमेरिकन तत्वज्ञ थोरो, "गीतेमध्ये असे काही सर्वव्यापी ज्ञान आहे, या तोडीचा अजून एकही ग्रंथ निर्माण झाला नाही" असे लिहून गीतेची महती विषद करतात. आज मानवाला नित्य आनंदी-निरोगी-प्रसन्न जीवन जगायचे असेल तर गीतेतील १८ अध्यायातून १८ तत्व अंगीकारून जीवन कृतार्थ करून घ्यावे! जय श्री कृष्ण! गीता माता की जय!

# जागतिक अपंग (दिव्यांग) दिन



किशोर सांगळे
संपर्क ७३८५९४५९५६

आधुनिक केसरी

**आज जागतिक अपंग(दिव्यांग) दिन हा दिवस दरवर्षी ३ डिसेंबर १९९२ पासून जगभरात साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने १९८३ ते १९९२ हे दशक अपंगासाठी अर्पण करण्यात आले होते.२०२२या वर्षीची थीम "सर्वसमावेशक विकासासाठी परिवर्तनात्मक उपाय: प्रवेशयोग्य आणि न्याय्य जगाला चालना देण्यासाठी नवकल्पनाची भूमिका"हि आहे.**

अपंग दिवसाचा इतिहासःबेल्जियम या देशांमध्ये जगातल्या सर्वात मोठया कोळशाच्या खाणीत रविवार दिनांक २० सप्टेंबर १९५९ रोजी भीषण स्फोट झाल्याने हजारो लोक मृत्यूमुखी झाले,गाडले गेले तसेच हजारो जखमीही झाले.

त्यात कित्येक मजुरांचे हात, पाय तुटले तर काहीतर राखेच्या धुरामुळे अनेक अंध तर आवाजामुळे असंख्य कायमचे कर्णबधीर झाले. बेल्जियम देशातील कोळशाच्या खाणीत जे मृत्युमुखी झाले. त्यांच्या वारसाला नियमानुसार नुकसान भरपाई मिळाली परंतु ज्यांना कायमचे वेगवेगळ्या प्रकारचे अपंगत्व आले अशा हजारो मजुरांना मात्र काहीच आर्थिक व इतर मदत न मिळाल्याने संताप निर्माण झाला.बेल्जियम सरकार आणि कोळशाच्या खाणी मालकाच्या विरोधामध्ये अपंगत्व आलेल्या मजुरांना आर्थिक मदतीबरोबर इतर सोयी सवलती मिळाव्यात यासाठी मोठे आंदोलन उभे राहिले.अपंगाच्या प्रश्नावर उभ्या राहिलेल्या या आंदोलनाकडे संपूर्ण जगाचे लक्ष वेधले गेले. बेल्जियम सरकार आणि कोळसा खाणी मालकाने दखल घेत अपघातात अंध,कर्णबधीर तसेच अपंगत्व आलेल्या हजारो आंदोलकांना योग्य तो आर्थिक मोबदला देत त्याबरोबरच अपघात विमा इतर मागण्या मान्य करण्यात आल्या. या अपंग दिनाची या दिवसाची एक आठवण संयुक्त राष्ट्र संघटनेने सन १९६२ या वर्षापासून मार्च महिन्यातील तिसरा रविवार हा जागतिक अपंग दिन साजरा करण्याचे ठरविले. आणि सन १९६२ पासून जगभरात जागतिक अपंग दिन साजरा करण्यात येऊ लागला. त्यानंतर जगभरात अपंगांच्या संघटना निर्माण होऊन अपंग व्यक्तींनी स्वतःच्या हक्क व अधिकारासाठी आंदोलने करण्यास सुरुवात केली.जगातले सर्व देशातील अपंग एकत्र झाले सर्वच देशांमध्ये अपंगांसाठी विविध योजना, कायदे असावेत.यामुळे संयुक्त राष्ट्र संघाने (UNO) सन १९८१ हे वर्ष जागतिक अपंग वर्ष म्हणून साजरे करण्याचे जाहीर करत १९८३ ते १९९२ हे दशक अपंगांसाठी अर्पण केले. भारतामध्ये सन १९९१ रोजी राष्ट्रीय अपंग पुनर्वसन परिषद कायदा तयार करण्यात आला. यानुसार अपंग व त्यांच्यासाठी काम करणाऱ्या सेवाभावी संस्था, संघटना व सरकारसाठी काही नियमावली करण्यात आली.जागतिक अपंग दिन मार्च महिन्यातील तिसऱ्या रविवारी ऐवजी आंतरराष्ट्रीय स्तरावर एकच दिवस असावा म्हणून १९९२ रोजी संयुक्त राष्ट्र संघटना व जागतिक आरोग्य संघटना यांनी ३ डिसेंबर हा जागतिक अपंग दिन अपंग व्यक्ती बद्दल सामान्य जनतेमध्ये जनजागृती निर्माण व्हावी या



उद्देशाने म्हणून साजरा करण्याचे ठरविले.अपंगांच्या समस्या सोडवण्यासाठी देशात सर्वत्र सेवाभावी संस्था संघटना राजकीय पक्ष शासन मांडत असून इतरांच्या तुलनेत दिव्यांग व्यक्तींच्या समस्या अतिशय तीव्र स्वरूपाच्या आहेत त्या सोडविण्यासाठी केंद्र सरकारने अपंग व्यक्ती हक्क अधिनियम १९९५ हा अपंग पुनर्वसन कायदा करत नोकरीत तीन टक्के आरक्षण केले त्यानुसार केंद्र व राज्य सरकारने शासन निर्णय पारित करून धोरणात्मक निर्णय घेत अपंगांना सोयी सवलती देण्याचे काम सुरू झाले १९९६ केंद्रीय अपंग वित्त व आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करत रेल्वे प्रवासात सवलत दि्ली. महाराष्ट्र राज्य सरकारने १९९७ रोजी महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करत बेरोजगार दिव्यांगांना व्यवसायासाठी कर्ज योजना सुरू केली. बस प्रवासात सवलत दिली. त्यानंतर सन २०१६ चा दिव्यांग हक्क अधिनियम कायदा केंद्र शासनाने करत या कायद्यानुसार दिव्यांगांचे ७ प्रकारावरून २१ प्रकार करण्यात आले असून अपंगांना नोकऱ्यांमध्ये ४% आरक्षण लागू करण्यात आले आहे.आज देशभरात अपंग व्यक्तींची संख्या तीन कोटी पेक्षा जास्त असून महाराष्ट्र राज्यात जवळपास ३५ लाखाच्या आसपास दिव्यांगबंधू-भगिनींची संख्या आहेत. नुकतेच महाराष्ट्र राज्य सरकारने स्वतंत्र दिव्यांग मंत्रालय सुरु करण्याची घोषणा केली आहे.३ डिसेंबर जागतिक अपंग दिनी हे मंत्रालय सुरु होईल.असे दिव्यांग मंत्रालय सुरु करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले आहे. समाजातील अपंग व्यक्ती सन्मानाने वागवल्या गेल्या पाहिजेत. त्यांना त्यांच्या अपंगत्वाचा तिरस्कार न वाटता एक स्वावलंबी आणि स्वाभिमानी जीवन जगता आले पाहिजे. समाजातील सर्व घटकांना त्यांच्याप्रती करुणा वाटली पाहिजे आणि सरकारने त्यांच्याप्रती विविध सुविधा आणि योजना अंमलात आणल्या पाहिजेत.

# अपमान आणि उपकार



आधुनिक केसरी

एकदा दोन मित्र वाळवंटातून चाललेले असतात, रस्त्यात त्यांच्यात काहीतरी बाचाबाची होते आणि बाचाबाचीचे रुपांतर भांडणात होते. इतके कडाक्याचे भांडण होते कि एक मित्र दुसऱ्या मित्राच्या थोबाडीत ठेवून देतो. ज्याला थोबाडीत बसते तो दुसरा मित्र खूप दुःखी होतो, गप्प बसतो आणि वाळूमध्ये बोटाने लिहितो," आज माझ्या प्राणप्रिय मित्राने मला थोबाडीत दिली, ज्याला मी जीवापाड मैत्री करतो त्याने मला आज मारले." ज्याने थोबाडीत मारलेली असते तो हे पाहतो पण काहीच न बोलता दोघेही पुढे चालत राहतात. पुढे गेल्यावर त्यांना एक तलाव दिसतो, दोघेही जण पाण्यात उतरून स्नान करायचे ठरवतात, अंघोळ करता करता थोबाडीत खाल्लेला मित्र अचानक पाण्यात घसरतो, तिथे नेमकी दलदल असते, तो जोरजोराने ओरडायला सुरुवात करतो. ज्याने थोबाडीत मारलेली असते तो मित्र क्षणाचाही विचार न करता आपल्या मित्राच्या सहाय्याला धावतो आणि त्याला त्या दलदलीतून बाहेर ओढून काढतो. जेंव्हा तो बुडणारा मित्र पाण्याबाहेर येतो, अंग कोरडे करतो तेंव्हा तो एका दगडाने दगडावर कोरून लिहितो,"आज माझ्या प्राणप्रिय मित्राने मला मरणाच्या दारातून ओढून परत आणले, मी आज मेलोच असतो पण त्याने स्वतःचा जीव धोक्यात घालून मला वाचविले." हे पण तो थोबाडीत देणारा वाचतो आणि त्याला राहवत नाही तो त्या मित्राला विचारतो कि,"पहिले मी तुला मारले तर ते तू वाळूत लिहिले आणि आता तुला पाण्यातून वाचविले तर ते तू दगडावर कोरून लिहिले हे असे का?" लिहिणारा मित्र म्हणाला," जेंव्हा कोणी आपल्या हृदयाला, मनाला, भावनेला ठेच लावेल तेंव्हा ते सर्व काही वाळूत लिहावे कारण काही काळानंतर वाळू हि विस्कळीत होऊन जाते आणि मनातील भावनाही फार काळ एकसारख्या राहत नाहीत. पण जर कुणी उपकार केले तर ते मात्र दगडावर कोरून लिहिले कारण दगडावर कोरलेले जसे कायमस्वरूपी टिकून राहते तसे उपकार हे कायम लक्षात ठेवले जावेत.

# प्रदूषण नियंत्रण काळाची गरज



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**औद्योगिक क्षेत्रासह संपूर्ण क्षेत्रातील प्रदूषणावर नियंत्रण असने अती आवश्यक आहे.औद्योगिक तसेच वैयक्तिक पातळीवर प्रदूषणाने अनेक ठिकाणी धोक्याची पातळी ओलांडल्याचे दिसून येते.याचा विपरीत परिणाम मानव, पशु-पक्षी,जीव-जंतु, जीवसृष्टी, नैसर्गिक संसाधने, आणि हवामानावर होत आहे.2 डिसेंबर 1984 च्या रात्री भोपाळ जवळील युनियन कार्बाईडच्या कारखान्यातून विषारी वायू गळती होऊन हजारो लोक मृत्युमुखी पडले.हा दिवस भारतसह जगासाठी काळीमा फासणारा ठरला. या दुर्घटनेची आठवण विशेषतः औद्योगिक क्षेत्रासाठी आणि यापुढे असे प्रकार घडू नये यासाठी सर्वांनीच काळजी घ्यावी म्हणून 2 डिसेंबर हा दिवस भारतात राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस म्हणून पाळला जातो.**

जगातील औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषणाशी संबंधित दुर्घटनांमध्ये भोपाळ वायू दुर्घटना सर्वात भीषण आणि महाभयानक होती.अशाच प्रकारच्या दोन घटना अमेरिकेतील थ्री माईल आयलॅंड (1979) आणि रशियातील चेर्नोबिल (1986) या औद्योगिक क्षेत्रातील भयावह घटना घडल्या होत्या.म्हणजेच पृथ्वीसह संपूर्ण जीवसृष्टीला प्रदूषण विनाशाकडे नेतांना दिसत आहे. मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे मानवच प्रदूषणावर नियंत्रण ठेवु शकतो.नद्यांच्या काठावर मानवी संस्कृती विकसित झाली.पुढे त्या मानवाच्याच साक्षीने त्या-त्या पध्दतीने सांस्कृतिक धरोहर घोषित करण्यात आली.परंतु ज्या नद्यांच्या काठावर मानवाने आपले ठीकाण बनवीले त्या नद्यांमध्ये दुषीत पाण्याचा लोंढा आपल्याला दिसुन येतो.पाण्याच्या दृष्टीकोनातून नद्यांच्या अवतीभवती मोठमोठी गावे वसायची व त्या नद्यांच्या पाण्याचा उपयोग शेतीच्या कामासाठी व पीण्याच्या पाण्यासाठी केला जात असे.परंतु आता परीस्थिती बदललेली दिसून येते.सध्याच्या परिस्थितीत नद्यांच्या अवतीभवती मोठमोठी औद्योगिक वसाहत पहायला मिळते.याच औद्योगिक क्षेत्रातील दुषीत पाणी नदीत सोडल्या जाते.त्यामुळे आपल्याला आजही अनेक मोठमोठ्या नद्या प्रदुषणाचा मार झेलतांना दिसतात आणि यामुळे त्यांच्या आजूबाजूचा संपूर्ण परीसरात प्रदूषित झालेला दिसुन येतो.प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सर्वेमध्ये असे लक्षात आले की देशातील प्रमुख नद्यांच्या 150 टापू प्रदूषीत असल्याचे सांगितले आहे.म्हणजेच नदि-नाले,तलाव, हवेतील वातावरण हे संपूर्ण प्रदुषणाकडे मोठ्या प्रमाणात वाटचाल करताना दिसत आहेत.याला मानवाने रोखले पाहिजे. आज भारताची राजधानी दिल्ली प्रदुषणाचे माहेरघर बनली आहे.त्यामुळे प्रदूषणाच्या बाबतीत भारताची चिंता दिवसेंदिवस वाढतच आहे.वाढत्या प्रदुषणाचे मुख्य कारण म्हणजे वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, जंगलकटाई, सांडपाणी इत्यादींमुळे आज पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीचे जगने कठीण झाले आहे.परंतु 2 डिसेंबर राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस या निमित्ताने सर्वांनीच प्रदूषणावर नियंत्रण आणण्याचा संकल्प केला पाहिजे.देशातील शहरीकरण रोखने, औद्योगिकरणावर नियंत्रण ठेवणे व देशातील जंगलतोड थांबवून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे. तेव्हाच आपल्याला प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यात यश प्राप्त होईल.



# भारताचे थोर सुपुत्र महात्मा जोतीराव फुले



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५


आधुनिक केसरी

**महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला.**

अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचर दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सर्वसाक्षी जगतप्ती। त्याला नकोच मध्यस्ती।।' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की

***विद्येविना मती गेली ।***
***मतिविना नीती गेली।***
***नितीविना गती गेली ।***
***गतिविना वित्त गेले ।***
***वित्ताविना शूद्र खचले ।***
***इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।***

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १९४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या. शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप वविरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले



नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्य पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभंगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे.

# श्री क्षेत्र गाणगापूर

आधुनिक केसरी

पूजेच्या वेळी झांकणें काढून आंतच लेपनविधी होतो आणि अन्य पंचोपाचारांसाठी ताम्हणांत 'उदक' सोडतात.
"प्रसिद्ध आमुचा गुरु जगी । नृसिंह सरस्वती विख्यात ॥
ज्याचे स्थान गाणगापूर । अमरजा संगम भीमातीर ॥"
श्रीक्षेत्र गाणगापुराला (GANAGAPUR) 'दत्तभक्तांचे पंढरपूर' म्हटले जाते. येथे हजारो दत्तभक्त नित्य दर्शनाला येत असतात. हे स्थान अत्यंत जाज्वल्य आहे. या जागृत स्थानात सर्व तऱ्हेचे पावित्र्य सांभाळावे लागते. भगवान श्रीदत्तात्रेयांचे द्वितीयावतार श्रीनृसिंह सरस्वती स्वामी यांचे इथे तब्बल तेवीस वर्षे वास्तव्य होते. या वास्तव्यात त्यांनी या क्षेत्री अविस्मरणीय अशा अनंत लीला केल्या. 'निर्गुण पादुका'च्या द्वारा इथे त्यांचे अखंड वास्तव्य आहे. कलेश्वर तिर्थ – गाणगापूर श्रीगाणगापूर क्षेत्राच्या पूर्वभागात श्रीकल्लेश्वर मंदिर आहे. हे जागृत शिवालय म्हणून प्रसिद्ध आहे. इथला पुजारी नरकेसरी कल्लेश्वराशिवाय अन्य कुणाला मानत नसे. श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी त्याला इथे अद्वैताचा साक्षात्कार घडविला. श्री क्षेत्र गाणगापूरच्या निर्गुण पादुकांच्या दर्शनाने ऐहिक दारिद्र्य क्षणात नष्ट होते, पारलौकिक कल्याण होते व सर्व तऱ्हेच्या मनोकामना पूर्ण होतात म्हणून इथे लाखो दत्तभक्तांची नेहमीच गर्दी असते. इथल्या देवस्थानचे पुजारी सत्त्वगुणी आहेत. ते यात्रेकरूंची धार्मिक कृत्ये, अभिषेक, पूजा, माधुकरी, नैवेद्य, ब्राह्मणभोजन वगैरे व्यवस्था चांगल्याप्रकारे करतात. श्रीक्षेत्र गाणागापुराला आलेले सर्व भक्त माधुकरी मागतात तसेच ते इतरांना माधुकरी वाढतात. स्वतः श्रीनृसिंह सरस्वती भिक्षा मागत असत.



'वसती रानी संगमासी । जाती नित्य भिक्षेसी ॥ तया गाणगापुरासी । माध्यान्हकाळी परियेसा ॥' असा श्रीगुरुचरित्रात उल्लेख आहे. दररोज बारा ते साडेबाराच्या सुमारास श्रीमहाराज भिक्षा मागण्यासाठी गावात येतात. परंतु साक्षात परमेश्वराचाच अवतार असल्यामुळे ते कोणाच्या रूपाने येऊन भक्तांची परीक्षा पाहतील हे आपण आपल्या मानवी अपूर्णत्वाने ओळखू शकत नाही. म्हणूनच या ठिकाणी येणारे दत्तभक्त यशाशक्ती अन्नदानाचा कार्यक्रम करतात. श्रीदत्तमहाराजांच्या दरबारात पाच घरची भिक्षा मागून प्रसाद ग्रहण केल्यास मन प्रसन्न होते. श्रीक्षेत्र गाणागापूर म्हणजे श्रीनृसिंह सरस्वतींची लीलाभूमी. अनेक भक्तांची दुःखे, संकटे नाहीसे करण्याचे कार्य त्यांनी इथे केले. त्यामुळेच या क्षेत्राला एक आगळे महत्त्व आलेले आहे. भीमा-अमरजा संगमामुळे या स्थानाला कमालीचे नैसर्गिक सौंदर्य प्राप्त झाले आहे. गाणगापूरचा परिसरही श्रीक्षेत्र नरसोबावाडीप्रमाणे नितांत रमणीय आहे. आषाढ शुद्ध पौर्णिमेला (श्रीगुरुपौर्णिमेला) श्रीव्यासपूजा साजरी करतात. संपूर्ण श्रावण महिनाभर भक्तमंडळी श्रीगुरुचरित्राचे पारायण करतात. मठात रोज शिवलिंगावर रुद्राभिषेक होतो. भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या दिवशी (गणेश चतुर्थीच्या दिवशी) श्रीपाद श्रीवल्लभ स्वामींचा जन्मोत्सव साजरा करतात. दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघन करण्यासाठी श्रींची पालखी भक्तमंडळींसह सायंकाळी श्रीकल्लेश्वर मंदिरात जाते. रात्रौ आठ वाजता परत येते.
श्रीपाद श्रीवल्लभ स्वामींचा अवतारसमाप्तीचा उत्सव आश्विन वद्य द्वादशीला म्हणजे गुरुद्वादशीला मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. त्या वेळेस महाप्रसाद वाटला जातो. नरक चतुर्दशीच्या दिवशी सर्व भाविक भक्त अष्ट तीर्थ स्नान करण्यासाठी जातात. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी श्रीदत्तप्रभूंची पालखी संगमावर जाते. त्याच रात्री भजनाच्या व नामस्मरणाच्या गजरात ती परत मठात येते. मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशीच्या दिवशी श्रीदत्तजयंतीनिमित्त येथे मोठा उत्सव होतो. दुपारी बारा वाजता दत्तजन्म साजरा करण्यात येतो. या उत्सवाला बाहेरगावची माणसे फार मोठ्या प्रमाणावर आलेली असतात. पौष शुद्ध द्वितीयेला श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचा जन्मोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येतो. माघ वद्य प्रतिपदा हा श्रीक्षेत्र गाणगापूर येथे साजरा होणारा सर्वात मोठा उत्सव होय. प्रतिपदेपासून चतुर्थीपर्यंत येथे मोठी यात्रा भरते. या दिवशी श्रीमहाराज श्रीशैल्यगमनास निघतात. चतुर्थीच्या दिवशी श्रीदत्तप्रभूंची पालखी रुद्रपाद तीर्थांहून पुनश्च मठात येण्यास निघते. हा सर्व सोहळा अत्यंत आनंदमय, मनाला स्फूर्ती देणारा असतो.

# वडोदबाजार येथे मुलीच्या जन्माचे भव्य स्वागत



आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथील पत्रकार उमेश गवळी व कोकिळा गवळी या दाम्पत्याला पहिलीच मुलगी झाली. मुलगी झाली प्रगती झाली असे म्हणत वडोद बाजार येथील गवळी परिवाराने मुलीच्या जन्माचे जंगी स्वागत केले. फुलांच्या, रांगोळीच्या पायघड्या टाकत फुलांचा वर्षाव करीत, फटाक्यांचा आतषबाजीत मुलीचे स्वागत केले. या वेळी बाळाचे आजोबा रतन गवळी म्हणाले की समाजातील मुलगा व मुलगी असा भेदभाव आपण नाहीसा केला पाहिजे.वंशाला दिवा पाहिजे असा विचार न करता,दोन्ही घरात प्रकाश देणार्या मुलीच्या जन्माचे सर्वांनी आनंदाने स्वागत करावे. आजच्या समाजाने मुलगा असो किंवा मुलगी असा कोणताच भेदभाव न करता दोन्हींच्या जन्माचे स्वागत मोठ्या उत्साहात केले पाहिजे. आमच्या कुटुंबात मुलगी जन्माला आल्यानंतर आम्ही तिचे मनापासून स्वागत केले. तीला आम्ही आमच्या घरची लक्ष्मी मानतो,अशी प्रतिक्रिया देत कन्येच्या आई – वडिलांनी आपला आनंद व्यक्त केला. या वेळी घरात आल्यानंतर चिमुकल्या नाजुकीचे आणि तिच्या आईचे औक्षण बाळाची आज्जी लताबाई गवळी, राणी गवळी, सुनिता साळवे, वैशाली घायतिलक. जयश्री अहिरे, गीता देशमुख यांनी केले. जिलेबी वाटून आनंद साजरा केला, तसेच बाळाचे काका शुभम गवळी यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते.



# गायरानधारकांच्या न्यायहक्कासाठी तहसीलदार यांना निवेदन

## शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढणार : हरिदास सराटे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** माननीय सर्वोच्च न्यायालय व हायकोर्टाने शासकीय गायरान जमिनीवर बेघर व भूमिहीन यांनी केलेले अतिक्रमण काढून घेण्याच्या आदेश दिले आहे अतिक्रमण केलेल्या धारकांच्या जागा नावे होण्यासाठी शासनास शिफारस करावे बाबत आपल्या सेवेची रयत शेतकरी संघटनेतर्फे विनंती निवेदन सादर करण्यात येते की सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेश स्वागत परंतु ज्या शासकीय गायरान जमिनीवर अतिक्रमण करून अतिक्रमधारकांनी घरे बांधून आपल्या कुटुंबासह त्या निवाऱ्यामध्ये 35 ते 40 वर्षापासून राहत आहेत आज ते घरे जर त्यांच्या ताब्यातून काढून टाकली तर ते बेघर होईल व त्यांच्या वरचा निवारा निघून त्यांचे संसार उघड्यावर पडेल तसेच काही गोरगरिबांनी शासकीय गायरान जमिनी अतिक्रम करून त्यावर आपल्या कुटुंबाची उपजीविका उदारनिर्वाह चे साधन म्हणून त्यात कष्ट करून अन्नधान्य पिकवून आपल्या कुटुंबाचा सांभाळ होत आहे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे आम्ही स्वागतच करतो परंतु अतिक्रमधारकास सहकार्य न्याय मिळावा म्हणून शासनास शिफारस करून या आदेश व शासनाचे शासकीय नियम यात पुनर्विचार करून अतिक्रमंधारकास न्याय कसा मिळेल यासाठी विचार करून त्यांच्या ताब्यात असलेल्या शासकीय गायरान जमिनी त्यांच्या नावे करण्यासाठी शासनाने शिफारस करावी ही नम्र विनंती. यावेळी रयत शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष एड रवी प्रकाश उर्फ बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले यावेळी महिला तालुका अध्यक्ष कमलताई मालोदे तालुका अध्यक्ष हरिदास सराटे उपाध्यक्ष रघुनाथ चव्हाण संघटक शिवाजी साळुंखे सहसचिव अण्णासाहेब देवकर सोमीनाथ पोपळे संजय साळुंखे चंद्रभागा हरिचंद्र मालोदे राजिया बेगम लक्ष्मीबाई मोरे तुळसाबाई काळे रेखा मालोदे वंदना मालोदे नंदा मालोदे हिरा मालोदे चंद्रभागा मोरे मंजुळा मालोदे वंदना दिलीप मालोदे शीला विठ्ठल मालोदे शकुंतला अशोक वाहूळ बाबासाहेब लक्ष्मण काळे अनिल अशोक वाहुळ या ठिकाणी रयत शेतकरी संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाझर तलावात अज्ञात व्यक्तीने टाकले उरलेले अन्न

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील बनशेंद्रा गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या पाणपोही येथील लघु पाझर तलावात गुरुवारी कोणीतरी अज्ञात व्यक्तीने मंगल कार्यलयात उरलेले उष्ट अन्न, पत्रवाळी ,प्लास्टिकचे ग्लास, चिरलेले वांगे, फ्लॉवर, भेंडी, मटकी भाजी, शिळा भात व तळलेले पदार्थ पिकअप गाडीने आणून टाकल्याने शुक्रवारी गावकऱ्यांनी पाहिले असता तलावात पाण्यावर तेलाचा तरंग आढळून आला त्यामुळे गावाकऱ्यात संतापाचे वातावरण पसरले होते कारण गावाला पिण्याचे पाणी पुरवठा करणारी विहिर याच तलावात असून याच तलावाचा काठावर अंगणवाडी व हाकेच्या अंतरावर वस्तीशाळा असून या बालगोपालांनाही याच ठिकाणावरून पाणी उपलब्ध होते त्यामुळे या तेलकट पाण्यातून विषबाधा होऊ नये म्हणुन व काही दुर्घटना घडू नये म्हणुन गावाकऱ्यांनी व ग्रामपंचायतणे लेखी निवेदन एम.आय.अनमाड, कंनिष्ठ



सहाय्यक अभियंता सिंचन विभाग,तहसीलदार,पोलीस विभाग यांना दिले असून अज्ञात त्यामुळे काही दुर्घटना घडू नये म्हणुन सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य, गावकरी व्यक्तीविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली आहे व काही दुर्घटना घडल्यास सर्वस्वी जबाबदारी प्रशांनाची राहील असेही कळविले आहे.

पाणीपुरवठा करणाऱ्या तलावात अज्ञात व्यक्तीने सडलेले अन्न वाहनाद्वारे आणून टाकले आहे त्यामुळे पाण्यावर तेलकट पणा आला असून पाण्यातून विषबाधा होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणुन संबंधित विभागासह प्रशासनाला लेखी निवेदन देऊन दोशीवर कारवाई करण्याची मागणी केली आहे . **–अविनाश कोकणी ( ग्रामविकास अधिकारी )**

---

बनशेंद्रा ग्रामपंचायतणे आमच्या कार्यालयास लेखी निवेदन याबाबतीत दिले असून दोषी असणाऱ्या लोकांवर आम्ही कायदेशीर कारवाई करन्यासाठी वरिष्ठ कार्यालयास तसा प्रस्ताव पाठवणार आहे वरिष्ठ कार्यालयाचा निर्णय आल्यावर काय कारवाई करता येईल ते तपासून कारवाई नक्की केली जाईल .

**–व्ही . पी .कांबळे ( उपविभागीय जलसंधारण अधिकारी, कन्नड )**

---

कन्नड तालुक्यात ग्रामपंचायतचा बिगुल वाजला असून ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रमांस सुरुवात झाल्याने आज निवेदन देण्यास गेल्याल्या गावकर्यांना बहुतेक कार्यलयात कोणी भेटले नाही त्यामुळे ग्रामविकास अधिकारी अविनाश कोकणी यानी व्ही . पी .कांबळे उपविभागीय जलसंधरण अधिकारी यांना भ्रमनध्वनीद्वारे संपर्क साधला व त्यांच्या कार्यालयात एम आय अनमाड, कंनिष्ठ सहाय्यक यांच्याकडे लेखी निवेदन सरपंच अंबादास मोरे, ग्रामविकास अधिकारी अविनाश कोकणी, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश कांबळे यानी गावकरी व ग्रामपंचायच्या वतीने दिले असून पाणी प्रदूषित करणाऱ्या अज्ञात व्यक्तीवर कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे .

# गॉर्डन एव्हिडेंस कलेक्शन आणि एडोर्समेंट फांऊंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना साहित्य वाटप



आधुनिक केसरी न्यूज


**धुळे :** गॉंर्डन एव्हिडेंस कलेक्शन आणि एडोर्समेंट फांऊंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक व क्रीडा साहित्य वाटप जि.प.शाळा तलावडीपाडा व राजश्री अहिल्याबाई होळकर माध्य. विद्यालय निकुंभे येथे करण्यात आले आहे धुळ्यातील फाउंडेशनचे डायरेक्टर कुंदन खरात यांच्या सहकार्यातून व नेतृत्वाखाली हे वाटप करण्यात आले आहे. सामाजिक उपक्रमातून विद्यार्थ्यांना साहित्य वाटप केल्याने या गोरगरीब विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर काल आनंदाची कळी उमरलेली दिसून आली आहे. अनेक विद्यार्थ्यांमध्ये कला गुण आत्मसात असतात मात्र आर्थिक कमकुवतमुळे त्यांच्यामध्ये निराशाची भावना निर्माण होते. या विद्यार्थ्यांना व्यासपीठ निर्माण व्हावे त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा त्यांना शिकण्यासाठी मदत व्हावी. या उदात्त हेतूने कुंदन खरात यांनी गॉंर्डन एव्हिडेंस कलेक्शन आणि एडोर्समेंट फांऊंडेशनतर्फे शैक्षणिक व क्रीडा साहित्य उपलब्ध करून दिले आहे. यामुळे त्यांचे सर्व स्तरावरून कौतुकही करण्यात येत आहे. यावेळी गावातील उपसरपंच गोरख गटा खंडेकर, नाबार्ड मुंबई बँकचे आत्माराम पाटील, फर्टीलायझर प्रमुख एकनाथ वाघ, ग्रा.पं सदस्य दादाभाई वाघ, भरत पाटील गजेंद्र वाघ, तलावडीपाडा येथील उपशिक्षिका संगीता पाटील, तसेच माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक भिका पवार, रमेश वाघ, रतिलाल खंडेकर, श्रीमती दुर्गा वाघ, आधी यावेळी उपस्थित होते.


काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in